# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील सोनवडे-शिवडाव हा रस्ता वन खात्याच्या परवानगीविना प्रलंबित असल्याबाबत

**(१) १०१४५ (०८-०४-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील सोनवडे-शिवडाव हा घाट कोल्हापूर व सिंधुदुर्ग तसेच गोवा यांना जोडणारा रस्ता वन खात्याच्या परवानगीविना प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा रस्ता मंजूर झाल्यास कोल्हापूर-गोवा मार्गासाठी पर्यायी मार्ग म्हणून याचा उपयोग होणार असल्याने वनविभाग सकारात्मक दृष्टया या विषयावर निर्णय घेईल काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०६-२०१६) :**(१) व (२) सोनवडे-शिवडाव घाट रस्ता हा जनहिताचा असल्यामुळे सकारात्मक दृष्ट्या विचार करुन, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत २५.७६ हेक्टर वनजमिन वळतीकरणाचा प्रस्ताव दिनाक २८/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी साद केला आहे.

सदर प्रकरणी केंद्र शासनाने दि.२५/०२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये मागविलेली पूरक माहिती केंद्र शासनास दि.१९/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सादर केली आहे.

---

### पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यातील वनविभागाच्या दुर्लक्षामुळे पर्यावरणाचे अस्तित्व धोक्यात आल्याबाबत

**(२) १३७३५ (०८-०४-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यातील १ लाख १७ हजार ३४९ हेक्टर भौगोलिक क्षेत्र असलेल्या २१ हजार ५६१ हेक्टरवर सागवानासह, धावंडा, पळस, चारोळी, आवळ, जांभुळ, हिरडा, मोह, सालइ, टेंभुणी, बेहडा, येळा, खैर, आपटा, निंब आदी झाडे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन ओसाड जागी व माळरानावर वृक्षारोपणाचा उपक्रम राबवून वनक्षेत्र वाढवित असताना पुसद परिसरातील वन परिक्षेत्रात प्रचंड वृक्षतोड करुन मोकळ्या जमिनीवर शेती करणे सुरु असून वन विभाग अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष करीत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांकडे तक्रार करुन अद्याप पर्यंत कुढलीही कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे व कसे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

पुसद तालुक्यातील वनजमिनीवर सागवानासह धावडा, पळस, चारोळी, आवळ, जांभुळ, हिरडा, मोह, सालइ, टेंभुणी, बेहडा, येळा, खैर, आपटा, निंब इ. प्रजाती आहेत.

(२) पुसद तालुक्यातील वनजमिनीवर ओसाड जागी मागील तीन वर्षात मंजूर कार्य आयोजनेनुसार वनीकरणाची कामे करण्यात आलेली आहेत.

सन २०१३ ते २०१६ मध्ये एकूण २७५.५४४ हे. वर अतिक्रमण झाले आहेत.

(३) वर्ष २०१३ ते २०१६ पर्यंत नोंदविण्यात आलेले वनगुन्ह्याचे एकूण २७५.५४४ वनजमिनीवर अतिक्रमण पुर्णपणे काढण्यात आलेली आहे.

(४) अवैध वृक्षतोडी व वनजमिनीवर अतिक्रमणाबाबत वनगुन्ह्यावर आळा घालण्यासाठी नियमित वनसंरक्षण संबंधी कामे केली जातात.

---

## आंबेगाव तालुक्याच्या (जि.पुणे) पश्चिम आदिवासी भागातील शेतकऱ्यांच्या शेतातील झाडांची अवैधपणे वृक्षतोड होत असल्याबाबत

**(३) १४३६८ (०८-०४-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव तालुक्याच्या (जि.पुणे) पश्चिम आदिवासी भागातील कळंबई, असाणे अडिवरे परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतातील झाडे अवैधपणे खाजगी व्यापारी वन विभागाच्या नावाखाली झाडांची वृक्षतोड करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,

(३) चौकशीनुसार संबधित अधिकारी व व्यापाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**औरंगाबाद कार्यालयात कोल्हापूरी बंधाऱ्याच्या गेट चोरी तसेच जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा योजनेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४) १८०८० (१४-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०७ मे, २०१५ रोजी मा.पालकमंत्री यांनी घेतलेल्या बैठकीमध्ये कोल्हापूर बंधा-याच्या गेट चोरी प्रकरणासह जिल्हापरिषदेच्या पाणी पुरवठा योजनात झालेल्या गैर व्यवहाराबाबत चौकशी करण्याचे आदेश व जलयुक्त शिवार योजनेची कामे तात्काळ सुरु व्हावीत यासाठी निविदा काढण्याचे आदेश मा.पालकमंत्री जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशी पुर्ण झाली आहे काय त्यात काय आढळून आले व दोषीवर आतापर्यंत काय कारवाई करण्यात आली आहे,

(३) अद्याप चौकशी पुर्ण करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व चौकशी पुर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) कोल्हापूरी पध्दतीने बंधारे गेट चोरी प्रकरणात यापूर्वीच संबंधीत पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जिल्हा परिषदेमध्ये भारत निर्माण योजनेअंतर्गत एकुण ९२ पणी पुरवठा योजनांपैकी ५९ पाणी पुरवठा योजनंचे मुल्यांकन पाणी पुरवठा समितीने करुन दिल्यामुळे काम पूर्ण करण्याबाबतची कार्यवाही उप विभागीय पातळीवर करण्यात येत आहे. उर्वरित ३३ योजनांसाठी लेखे दस्तऐवज, मोजमापी पुस्तीका इ. कागदपत्रे जमा करुन घेणेबाबत संबंधीत गट विकास अधिकारी व उप अभियंता यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, औरंगाबाद यांच्यामार्फत सूचना देण्यात आल्या आहेत.

जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत मंजुर कामाच्या ई-निविदा काढण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर, दौंड व पुरंदर तालुक्यातील मृद व जलसंधारण कामात कोट्यवधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार**

**(५) १९२६१ (१७-०९-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर, दौंड व पुरंदर तालुक्यातील मृद व जलसंधारण कामात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याने या कामाची चौकशी करण्याची मागणी दिनांक ८ मे, २०१५ रोजी कृषी आयुक्त पुणे यांच्याकडे नागरिकांनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे जिल्ह्यात मागील दोन वर्षापासून गतीमान पाणलोट क्षेत्र पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम सलग समतल चर व ओढा खोलीकरण, सिमेंट बंधारे इत्यादी कामे निकृष्ट दर्जाची झाल्याची तक्रार केली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिरुर तालुक्यातील जलसंधारण विभागाकडील टंचाईग्रस्त गावामधील अनेक कामे मंजूर असूनही मागील दोन वर्षपासून ती पूर्ण करण्यात अलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शिरुर तालुक्यामध्ये जलसंधारण कार्यकारी अभियंता यांच्यामार्फत सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मध्ये केलेली सिमेंट बंधा-यांची कामे अपूर्ण असून अनेक कामे सुरुही करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनस्तरावरुन केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१६) :**(१) व (२) होय हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

शिरुर तालुक्यात टंचाईग्रस्त गावामध्ये जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून २८ कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून, वरील कामांची निविदा प्रक्रीया पूर्ण झाली आहे. उपरोक्त कामांपैकी २२ कामे पूर्ण झाली आहेत व उर्वरित ४ कामे प्रगती पथावर आहेत. उर्वरित २ कामे रद्द करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(४) हे खरे नाही.

शिरुर तालुक्यात जलसंधारण कार्यकारी अभियंता यांच्यामार्फत सन २०१३-१४ मध्ये २१ कामांना मंजूर दिली होती, त्यापैकी १६ कामे पूर्ण झाली असून, ४ कामे प्रगती पथावर आहेत व उर्वरित एका कामास शेतक-यांचा विरोध असून सदर काम रद्द करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे काम प्रगती पथावर आहे. तसेच सन २०१४-१५ मध्ये एकूण ७ कामांना मंजूर दिली होती. त्यातील ६ कामे पूर्ण झाली आहेत.
(५) तक्रार केलेल्या कामांची तक्रादारासोबत तपासणी करण्यात आलेली आहे. तक्रारदाराने लेखी अर्ज देऊन सदर तक्रार हि गैरसमजुतीतून केली असल्याचे मान्य केले आहे व तसे लेखी कळविले आहे.

---

**देऊळगांव कुंडपाळ (जि.बुलढाणा) येथे शासनाने एकात्मिक पाणलोट क्षेत्र सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित कामे निधी अभावी रखडल्याबाबत**

**(६) १९७८७ (१७-०८-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देऊळगांव कुंडपाळ (जि.बुलढाणा) येथे शासनाने एकात्मिक पाणलोट क्षेत्र सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित कामे निधी अभावी रखडली असल्याचे माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या कामांना निधी न मिळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या कामांना तातडीने निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

देऊळगाव कुंडपाळ हे गाव सन २०१३-१४ मध्ये विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत समाविष्ट करण्यात आले आहे.

सन २०१५-१६ मध्ये सदर गावाची जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवड करण्यात आली असून सदर गावातील प्रलंबित कामे करण्यासाठी प्रकल्प आराखड्याचे नूतनीकरण करुन त्यास मंजूरी घेण्यात आली आहे.
(२) व (३) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत देऊळगाव कुंडपाळ या गावाचा १८६.११ लाख रुपयांचा कृति आराखडा तयार करण्यात आला असून त्याअंतर्गत ७ सिमेंट नाला बांधासाठी रक्कम रु. ५६.५४ लाख व ३९४ हेक्टर वरील ढाळीची बांधबंदिस्तीसाठी रु. ३५.३८ लाख अशा एकूण रु. ९१.९१ लाख रकमेच्या कामास मंजूरी प्राप्त झाली असून सदर गावात कामे सुरु करण्यात आली आहेत.

उर्वरित रक्कम ९४.१९ लाख रु. कामांचे नियोजन करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पन्हाळा (जि.कोल्हापूर) येथे कृषी विभागामार्फत राबविण्यात येणा-या योजनांची कामे करण्यासाठी वापरण्यात येणा-या मशिनचा झालेल्या अपहाराबाबत.**

**(७) २१८४६ (०६-०८-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पन्हाळा (जि.कोल्हापूर) येथे कृषी विभागामार्फत राबविण्यात येणा-या योजनांची कामे करण्यासाठी नोंदणीकृत मशिनचा वापर करण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पन्हाळा तालुक्यामध्ये एकाही नोंदणीकृत मशिनद्वारे काम न करता खाजगी मशिनद्वारे काम करुन देयके काढण्यात आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कोल्हापूर कृषी विभागाकडे नोंद झालेल्या मशिनरीची कोणतीही कागदपत्रे उदा. RCTC किंवा विमा इत्यादी उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषी अधिका-यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

कोल्हापूर कृषी विभागाकडे नोंद झालेल्या मशिनरीची नोंद झालेल्या मशिनरीची कागदपत्रे उदा. आरटीसी किंवा विमा इत्यादी उपलब्ध आहेत. त्यानुसार सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये कागदपत्रांची छाननी करुन पायाभूत दराप्रमाणे कामे करण्यास त्यार असलेल्या सन २०१३-१४ मधील एकूण ६७ व सन २०१४-१५ मधील एकूण ९३ यंत्र धारकांची निवड करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धानोरा-लोणी (ता.आष्टी,जि.बीड) या प्रमुख जिल्हा मार्गाची मोठ्या प्रमाणावर झालेली दुरवस्था**

**(८) २७७८६ (१७-०८-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धानोरा-लोणी (ता.आष्टी, जि.बीड) या प्रमुख जिल्हा मार्गाची दुरवस्था झाली असल्याने सद्यस्थितीत स्थानिक ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रमुख जिल्हा मार्गाच्या दुरुस्तीसाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०१-२०१६) :**(१) होय, अंशत: खरे आहे.

सदर रस्त्याच्या एकूण ४५.२० किमी लांबीपैकी ५ किमी लांबीमध्ये रस्ता खराब झाला आहे.

(२) व (३) खराब रस्ता लांबीपैकी २ कि.मी.लांबी ही कुंटेफळ साठवण तलावाच्या बुडीत क्षेत्रात जाते, उर्वरित ३ कि.मी. लांबीतील रस्त्याच्या दुरुस्तीबाबत निधी निकषाच्या अनुषंगाने काम हाती घेण्यात येईल.

---

**शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेच्या जाचक अटीबाबत**

**(९) २९९७५ (१२-०१-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेच्या अटी जाचक असल्याने अनेक गावांना त्यात सहभागी होता आले नसल्याचे प्रतिपादन मा.जलसंपदा राज्यमंत्री यांनी केले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचा अभ्यास करून या योजनेतील जाचक अटी दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## फलटण (जि.सातारा) तालुक्यातील पाझर तलावांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१०) ३०५१३ (१२-०१-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फलटण (जि.सातारा) तालुक्यात पश्चिम भागात १९७२ मध्ये लोकांच्या हाताला काम मिळावे म्हणून पाझर तलावांची मोठ्या प्रमाणात कामे झाली परंतु काळ्या मातीचा अभाव व मातीवर रोलिंग न फिरविल्यामुळे पाझर तलाव भरतात, परंतु गळती होऊन ते महिन्याभरात रिकामे होऊन कोरडे पडतात, तेव्हा पाझर तलाव दुरुस्ती करण्याची मागणी होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाझर तलावांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही कली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

केंद्र शासन पुरस्कृत दुरुस्ती नुतनीकरण व जलपुर्नभरण योजनेंतर्गत फलटण तालुक्यातील ४५ पाझर तलावांचे प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात आले होते. परंतु सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सुचनेनुसार पाझर तलावाचे पाणी साठवण क्षेत्र ५ हेक्टर पेक्षा जास्त असावे या मानकामध्ये बसत नसल्यामुळे त्यांना अद्याप मंजुरी मिळालेली नाही.

लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, सातारा अंतर्गत ९० पाझर तलावांचा समावेश होते. यापैकी ३९ पाझर तलावांची कामे सन १९७२ ते १९८० पर्यंत रोजगार हमी योजनंतर्गत करण्यात आलेली आहे. या कामांपैकी काही पाझर तलावांचे तळातून व मुळ नाल्याचे भागामधुन काही प्रमाणात गळती आहे. ग्रामपंचायतींनी केलेल्या मागणीनुसार उपरोक्त पैकी ०७ कामांची रु.२५.०० लक्ष किंमतीची दुरुस्ती जिल्हा परिषद सेस मधुन करण्यात आलेली आहे.

जलयुक्त शिवार अभियानामध्ये समावेश असलेल्या २३ गावांमधुन १५ पाझर तलाव दुरुस्तीची मागणी आलेली आहे. त्यापैकी रु.६३.८६ लक्ष किंमतीच्या ०९ कामांना मंजुरी मिळालेली असून त्यांची कामे प्रगती पथावर आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे अंतवडी (ता.कराड, जि.सातारा) येथील लघुपाटबंधारे तलावाचे काम विशेष बाब म्हणून करण्याच्या मागणीबाबत**

**(११) ३०५८२ (१२-०१-२०१६). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अंतवडी (ता.कराड, जि.सातारा) येथील लघुपाटबंधारे तलावाचे कामास अंदाजपत्रकास मान्यता घेवून सदर लघुपाटबंधारे तलावाचे काम विशेष बाब म्हणून करण्याची मागणी मा.जलसंपदा व जलसंधारण मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ रोजी व तत्पूर्वी अनेकवेळा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१६) :**(१) होय.

(२) लघु पाटबंधारे तलाव अंतवाडी, ता.कराड, जि.सातारा या योजनेच्या कामाची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. तथापि, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे दिनांक १४/१०/२०१४ चे पत्रान्वये योजनेच्या पुढील कामाबाबत कार्यवाही स्थगित करण्यात आली आहे. तसेच दिनांक २४/९/२०१५ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या ४९ व्या बैठकीत दिनांक १/४/२०१४ नंतर प्रशासकीय मान्यता दिलेल्या ११३० जलसंधारण योजनांपैकी जलयुक्त शिवार अंतर्गत प्रस्तावित असलेल्या १०१ योजना वगळून उर्वरित योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. त्यामुळे लघु पाटबंधारे तलाव, अंतवाडी योजना रद्द करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरुर (ता.अनंतपाळ,जि.लातूर) थेरगाव येथील पाझर तलाव-३ साठी शासनाने सन २००२ पूर्वी संपादित केलेल्या जमिनीची शेतकऱ्यांना अत्यल्प नुकसान भरपाई दिल्याबाबत**

**(१२) ३२४६३ (२२-०१-२०१६). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर अनंतपाळ तालुक्यातील (जि.लातूर) थेरगाव येथील पाझर तलाव-३ साठी शासनाने सन २००२ पूर्वी संपादित केलेल्या जमिनीची शासनाने अत्यल्प नुकसान भरपाई दिल्याने सदरहू शेतकऱ्यांनी शासनाच्या नुकसान भरपाईच्या विरोधात न्यायालयात वाढीव नुकसान भरपाईसाठी दावा केल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने २ वर्षापूर्वी सदरहू शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल देवून त्या शेतकऱ्यांना वाढीव नुकसान भरपाई देण्यात यावी, असे आदेश शासनाला दिलेले असतानाही, आजमितीस पाझर तलाव क्र. ३ साठी संपादित केलेल्या १४ एकर जमिनीची नुकसान भरपाई आजमितीस शासनाने दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) संबंधित शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, लातूर, तहसिलदार, शिरुर अनंतपाळ, कार्यकारी अभियंता जलसंपदा विभाग, लातूर आदींकडे मागील सुमारे दीड ते दोन वर्षापासून पाठपुरावा केलेला असतानाही सदरहू शेतकऱ्यांना संपादित केलेल्या जमिनीची उच्च न्यायालयाच्या निकालानुसार वाढीव नुकसान भरपाई देण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) सदरहू शेतकऱ्यांच्या मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुषंगाने विनाविलंब वाढीव नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१६) :**(१) होय, अंशत: खरे आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी संबंधित भूधारकांनी मा.दिवाणी न्यायालयाचे विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे दाखल केलेल्या प्रथम अपीलावर मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद न्यायालयाने वाढीव मोबदला देण्याचा निर्णय दिनांक १६/८/२०१३ रोजी दिला होता. त्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, लातूर यांनी दिनांक २७/११/२०१५ अन्वये मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे अपील दाखल केले आहे. अद्याप निर्णय प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोले तालुक्यातील (जि.अहमदनगर) काळेवाडी (जांभळे) व बदगी (खिळपाट) येथील तलावांचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१३) ३३०३३ (१२-०१-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोले तालुक्यातील (जि.अहमदनगर) काळेवाडी (जांभळे) व बदगी (खिळपाट) येथील साठवण तलावांना दोन वर्षापूर्वी मान्यता देवूनही अद्याप निधी न दिल्याने साठवण तलावाचे काम करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दोन्ही साठवण तलावासाठी निधी उभारुन साठवण तलावाचे काम तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) महामंडळातील स्थगित करण्यात आलेल्या २३३० योजनांमध्ये सदर योजनांचा समावेश असुन महामंडळाच्या निर्णयानुसार या योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

---

**सिंदखेड राजा (जि.बुलडाणा) येथील धांदरवाडी, दत्तापूर शिवारामधील पाझर तलावाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१४) ३४२७५ (१२-०१-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेड राजा (जि.बुलडाणा) येथील धांदरवाडी, दंत्तापूर शिवारामधील पाझर तलावाचे काम मोजमाप होऊन अद्यापी मंजूरी अभावी प्रलंबित असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शिवारात कोरडवाहू शेती असल्यामुळे उत्पन्न फारच कमी असून बरेचसे शेतकरी अल्पभूधारक, असल्यामुळे उपजिविका भागवणे फारच कठीण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पाझर तलाव तयार झाल्यास संपूर्ण शेती बागायती होईल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू पाझर तलावाचे काम हाती घेण्याकरिता लाभधारक शेतकऱ्यांनी संबंधितांकडे विनंती अर्ज करुनही अद्यापी कोणती कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू पाझर तलावाचे काम तात्काळ हाती घेण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हा पाझर तलाव झाल्यास त्यापासून ३२ हेक्टर शेतीला अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभ होईल.

(४), (५) व (६) या तलावाचे कामासाठी एकूण ८.११ हेक्टर जमिन बाधित होणार आहे. ही शेती गट नं.८१ व गट नं. १२२ मधील असून या शेतीचे मालकांनी जमिन देण्यास नकार दिलेला आहे. त्यामध्ये पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

**वर्दे धरण (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) जमिनी भुसंपादनाबाबत**

**(१५) ३५२३४ (१२-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्दे धरण (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) जमिनी भुसंपादनाबाबतच्या जमिनीच्या उता-यावार मुळ खातेदार शेतकरी व इतर हक्कात वने अशी नोंद करण्यात आल्यासंदर्भातील दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी राज्यमंत्री जलसंधारण यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत उक्त जमिन ही मुळ खातेदाराची असल्याचे स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिनी उपविभागीय अधिकारी यांच्यासमवेत माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान बैठक घेऊन सदर प्रकरणी वन विभागाने सदरहू जमिन शेतक-यांची असल्याचे मान्य करुन तसा अहवाल शासनास सादर करण्याबाबत बैठकीत निर्णय घेण्यात आला होता हेही खरे आहे काय, त्यानुसार अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार उक्त जलसंधारण विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी उप वन संरक्षण वन विभाग सावंतवाडी यांच्याकडे २५०.७५ लक्ष रुपये वर्ग केलेले रक्कम पुनश्च जलसंधारण विभागाकडे वर्ग करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) असल्यास, सदर रक्कम जलसंधारण विभागाकडे वर्ग करुन ती मुळ खातेदार शेतकरी यांना देण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहे, व सदर रक्कम किती कालावधीमध्ये शेतक-यांना देण्याचे अपेक्षित आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१६) :**(१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

मा.राज्यमंत्री (जलसंधारण) योचे बैठकीच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधीची उप विभागीय अधिकारी, कुडाळ यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२/१०/२०१५ रोजी बैठक झाली त्यावेळी इतर अधिकारात वने या सदराखाली असलेल्या मूळ खातेदारांना द्यावयाच्या मोबदल्या संदर्भात चर्चा झाली. यावेळी सदर वनसंज्ञा असलेल्या जमिनीचे हस्तांतर करणेकरिता उपवनसंरक्षक, वन विभाग सावंतवाडी यांचेकडे भरणा केलेली नेट प्रेझेंट व्हॅल्यू (NPV) ची रक्कम रुपये २५०.७५ लक्ष जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांचेकडे हस्तांतर करणेच्या तसेच याबाबत आवश्यक कार्यवाही करणेच्या सूचना दिल्या. त्यानुसार उपवन संरक्षक, वन विभाग सावंतवाडी यांनी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचेकडे मार्गदर्शन मागितले आहे. त्यामुळे यापुढील कार्यवाही वन विभागाकडून सुरु आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिपळूण तालुक्यातील (जि.रत्नागिरी) लघु सिंचन प्रकल्पांच्या कामांची फेर निविदा प्रक्रिया सुरू करण्याबाबत

**(१६) ३७८९४ (२१-०१-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण तालुक्यातील (जि.रत्नागिरी) मुंढे तर्फे सावर्डे, कापरे, गांग्रई, गणेशपूर, रिक्टोली-तिवडी या लघु सिंचन प्रकल्पांची पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या व रीतसर प्रशासकीय मान्यता झालेल्या कामांच्या निविदा रद्द करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील सिंचनाचा अनुशेष व डोंगरी भागातील उन्हाळी हंगामात पिण्याच्या व शेतीसाठी पाण्याची तीव्र टंचाई असल्याने सदर प्रकल्पांची कामे सुरू होण्याच्या दृष्टीने फेर निविदा प्रक्रिया सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी मा.जलसंधारण मंत्री यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तदनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या संचालक मंडळाची दिनांक २४ सप्टेंबर, २०१५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या ४९ व्य बैठकीमध्ये २९ योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आली. सदर २९ योजनांमध्ये मुंढे तर्फे सावर्डे, कापरे, गांग्रई, गणेशपूर, रिक्टोली-तिवडी या योजनांचा समावेश आहे. त्यामुळे या योजनांची निविदा प्रक्रियेची कार्यवाही करणेचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात जिल्हापरिषदेमार्फत बांधण्यात आलेल्या कोल्हापूरी बंधाऱ्यावर फायबरच्या पाटया बदलून लाकडी किंवा लोखंडी पाटया बसविण्यासंदर्भात**

**(१७) ३८३८५ (१२-०१-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जिल्हापरिषदेमार्फत बांधण्यात आलेल्या कोल्हापूरी बंधाऱ्यावर फायबरच्या पाट्या बसविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) सदरच्या पाट्या या फायबरच्या असल्याने या पाट्या चोरीला जाण्याचे प्रमाण वाढत असल्याने पाण्याची गळतीही होत असल्याचे पाणीही वाया जाते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या पाट्या बदलून लाकडी किंवा लोखंडी पाट्या बसविण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(४) अद्याप निर्णय झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१६) :**(१) ठाणे, नाशिक व औरंगाबाद मंडळांतर्गत काही कामांवर कोल्हापूरी बंधाऱ्यावर फायबरच्या पाट्या बसविण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे नाही.
कोल्हापूरी जिल्ह्यातील एका कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यातून गळती आढळून आली असून तात्पुरती उपाययोजना करुन गळती थांबविण्यात आली आहे.
(३) कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यासाठी लोखंडी निडल्सचा वापर होत आला असल्याने लोखंडी निडल्सच्या वापरावर प्रतिबंध नसल्याबाबत शासन पत्र क्र. संकिर्ण-२०१४/प्र.क्र.१०९/जल-१, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१५ अनुसार कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यातील बहीरखेड व महागाव पिंजर शिवारातील कोल्हापूरी बंधारा अपुर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१८) ३८७४९ (१२-०१-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यातील बहीरखेड व महागाव पिंजर शिवारातील कोल्हापूरी बंधारा (जिल्हा परिषद विभाग) किमान ८ वर्षापासून अपुर्ण आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, जिल्हा परिषद मान्यता असताना काम अपूर्ण असल्याचे कारण काय आहे
(३) असल्यास, या बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा कण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

उप अभियंता, लघु सिंचन उपविभाग जिल्हा परिषद, बार्शिटाकळी यांचेकडून कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा बहिरखेड-४, तालुका बार्शिटाकळी जिल्हा अकोला या योजनेचे काम दिनांक १० जानेवारी, २०११ रोजी पूर्ण करण्यात आले आहे. तसेच कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा वडगांव पिंजर, तालुका बार्शिटाकळी योजनेचे काम दिनांक २८ डिसेंबर, २०१० रोजी पूर्ण झालेले असून पाणीसाठा निर्माण झाला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शाहुवाडी तालुक्यातील (जि.कोल्हापूर) नांदगाव येथील जंगलात राजरोस वृक्षतोड होत असलेबाबत**

**(१९) ३९९५६ (०७-०५-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव (ता. शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथील जंगलात राजरोस वृक्षतोड होत आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, एकीकडे शासन लाखो रुपये खर्च करून हरित क्रांती घडावी यासाठी प्रयत्न करीत आहे परंतु जंगलांना पटांगणाचे स्वरूप प्राप्त होत आहे, हे खरे आहे काय
(३) असल्यास, वृक्षतोडीची माहिती वनविभागाला व शासनाला अवगत आहे, हे ही खरे आहे
(४) असल्यास, सदर होणाऱ्या वृक्षतोडीला जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१६) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वनपाल, वन रक्षकांना शस्त्र पुरविण्याबाबत**

**(२०) ३९९९२ (११-०३-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ४० वन विभागामध्ये २० पेक्षा अधिक वन परिक्षेत्रात अवैध सागवान तस्कर, अतिक्रमण आणि वाघ बिबट्यांची शिकार करणाऱ्या सशस्त्र टोळ्यानी धुमाकूळ घातला असून, प्रत्यक्ष जंगलाचे संरक्षण करणाऱ्या, वनपाल वन रक्षकांना कोणत्याही प्रकारची शस्त्रे देण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विस्तीर्ण जंगल आणि पशुपक्षांचे संरक्षण करता न येणे, तसेच तस्करांनी वेढलेल्या जंगलात वन कर्मचाऱ्यांवर वारंवार होणारे हल्ले यांच्यापासून वन कर्मचाऱ्यांचे संरक्षण या बाबी कठीण झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वन कर्मचाऱ्यांना शस्त्रे देण्याची मागणी वनपाल, वनरक्षण संघटनेने अनेकवेळा शासनाकडे करुनही त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०३-२०१६)** :(१) हे खरे नाही
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) वनअधिकारी/कर्मचारी यांना ९ एमएमच्या ७२० पिस्तुल व एसएलआर राफफल ५१४ स्वसंरक्षणार्थ उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

---

### राधानगरी अभयरण्यात भेकर या दुर्मिळ प्रजातीच्या वन्यजीवाची शिकार केल्याबाबत

**(२१) ४००३४ (०७-०५-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापुर जिल्ह्यातील राधानगरी अभयारण्यात भेकर या दुर्मिळ प्रजातीच्या वन्यजीवाची शिकार केल्याची धक्कादायक बाब माहे जानेवारी २०१६ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, वनविभाग व वन्यजीव विभाग यांच्या अंतर्गत वादातून हे शिकारीची प्रकरण दडपण्यात आले होते, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, सदर शिकाऱ्यांना वनविभाग व वन्यजीव विभागाच्या कर्मचारी सहभागी असल्याचे तपासात उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, सदर तपासामध्ये कोणती माहिती निष्पन्न झाली व त्याअनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०६-२०१६)** :(१) भांडणे, राधानगरी अभयारण्य (कोल्हापूर) येथे भेकराची शिकार केल्याचे आढळून आले नाही तथापि दिनांक ११.११.२०१५ रोजी दहा लाकांनी विना परवाना बंदूक व काडतुसांसह अभयारण्य क्षेत्रात अपप्रवेश करुन विस्तव निर्माण केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) भांडणे, राधानगरी अभयारण्य (कोल्हापूर) येथे भेकराची चोरटी शिकार केल्याचे आढळून आले नाही तथापि दहा लोकांनी विना परवाना बंदूक व काडतुसांसह अभयारण्य क्षेत्रात अपप्रवेश करुन, विस्तव निर्माण केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे.

ह्या प्रकरणी १० जणांना अटक करण्यात आले आहे. ह्या प्रकरणी १० जणांना अटक करण्यात आली होती. अटक करण्यात आलेल्या व्यक्तीमध्ये जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे कार्यालयातील एक कर्मचारी व कार्यकारी अभियंता, दुधगंगा कालवे विभाग क्र. १ कोल्हापूर यांचे कार्यालयातील एक अशा दोन व्यक्तींचा समावेश आहे.

उपरोक्त २ कर्मचाऱ्यांपैकी एका व्यक्तीस सेवेतून निलंबीत करण्यात आले असून एका कर्मचाऱ्यांच्या गैरवर्तनाबाबत त्यांच्याविरुध्द खात्यांतर्गत चौकशी करण्यात येत आहे.

तसेच सदर प्रकरणी दोन वन कर्मचाऱ्यांनाही निलंबित करण्यात आले आहे व एका वनअधिकाऱ्यांविरुध्द निलंबनाची कारवाई प्रस्तावित आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींना मा.न्यायलयाने जमिनावर सोडले आहे. उक्त आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यात वृक्षतोडीत झालेल्या वाढीबाबत**

**(२२) ४०२१८ (०७-०५-२०१६). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात मोठया प्रमाणात वृक्षांची वृक्षतोड होत असून २०१५ या वर्षात सुमारे ९,७०३ वृक्षांची विना परवाना वृक्षतोड करण्यात आलेल्या २८१ जणांवर वन विभागाने कारवाई करुन त्यांच्याकडून ४ लाख १४ हजार ६५० रुपये दंड गोळा करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारची अवैधपणे जंगलातील झाडांची वृक्षतोड रोखण्यासाठी वन विभागामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१६)** :(१) रत्नागिरी जिल्ह्यात सन २०१५ मध्ये खाजगी मालकी क्षेत्रात एकूण २५१ प्रकरणात महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, १९६४ अंतर्गत १२,१९५ अनुसूचित झाडांची वृक्ष अधिकारी यांनी परवानगी न घेता तोड करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी चौकशी करण्यात येऊन खाजगी मालकी क्षेत्रातील मनाई प्रजातीचे वृक्ष विनापरवाना तोडल्याबाबत २५१ प्रकरणात दोषी आढळलेल्या ६९९ व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करण्यात येऊन रु.६,१९,२५० इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(२) रत्नागिरी जिल्ह्यामध्ये भौगोलिक क्षेत्राच्या ०.८४% एवढे शासकीय वनक्षेत्र आहे. उर्वरित क्षेत्र हे खाजगी मालकीचे आहे. मालकी क्षेत्रातील वृक्षतोड नियंत्रित करण्यासाठी वनाधिकारी/कर्मचारी त्यांचे कार्यक्षेत्रात नियमितपणे गस्त घालतात. तसेच कायद्यातील तरतुदीनुसार गुन्हे प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### हरित लवादाच्या निर्णयाने टाळंबा प्रकल्प अडचणीत आल्याबाबत

**(२३) ४०२३१ (०७-०५-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय हरित लवाद वनसंज्ञेखालील क्षेत्र विकासात्मक प्रकल्पासाठी वळते करण्याअगोदर हरित लवादाची परवानगी घेण्याचे आदेश माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आल्यामुळे टाळंबा धरणप्रकल्पासमोर मोठी अडचण निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय

(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रकल्पाचे काम तातडीने सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०६-२०१६) :**(१), (२) व (३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी टाळंबा प्रकल्पाकरिता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत ६२३.३१८ हे वनजमिन वळतीकरणाचा प्रस्ताव नामंजूरीच्या शिफारशीसह दि.१६/०७/२०१३ रोजीचे पत्रान्वये राज्य शासनास सादर केला होता .तथापि टाळंबा प्रकल्पाचे वनक्षेत्र पश्चिम घाटातील अत्यंत संवदेनशील क्षेत्र असून, त्याचा पर्यावरण संवेदनशील क्षेत्रामध्ये समावेश आहे, सदर प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाचा ऱ्हास होणार असल्याने सदरचा प्रस्ताव केंद्र शासनास शिफारस न करण्याचा निर्णय दि. २३/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये घेतला आहे.

मा.हरित न्यायाधिकरण पश्चिम झोन, पुणे यांचा निर्णय दि. ०३/१२/२०१५ ला झाला आहे.

जलसंपदा विभागाने सदर प्रस्तावाबाबत पुनर्विचार करण्याबाबत विनंती केली आहे. त्यात अनुसरुन मा.मंत्री (वने) यांचे अध्यक्षतेखाली मा.मंत्री (जलसंपदा) यांचे उपस्थितीत वन विभाग व जलसंपदा विभागातील संबंधित अधिकारी यांची संयुक्त बैठक घेण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वन विभागाची व्याघ्र कक्ष (Tiger Cell) ची बैठक झाली नसल्या बाबत

**(२४) ४०२७२ (०७-०५-२०१६). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात मागील ५ महिन्यापासून सोलापुर जिल्हा वन विभागाची व्याघ्र कक्ष (Tiger Cell) ची बैठक झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदरील व्याघ्र समिती जागरूक नसल्याने सोलापूर शहरात व जिल्हयात वन गुन्हयाचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर बैठक घेण्या संबंधी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे तसेच बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली अथवा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

पोलीस अधिक्षक, सोलापूर यांचे कार्यालयात दिनांक ०४/०२/२०१६ रोज सांयकाळी ५.०० वाजता सोलापूर जिल्हा व्याघ्र कक्ष (Tiger Cell) ची बैठक आयोजित करण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुर्ग सावंगी (ता. कळमनूरी, जि.हिंगोली) येथे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी विनापरवाना तोडलेले सागवान व वृक्षतोड मशीन जप्त केल्याबाबत**

**(२५) ४१३४४ (०७-०५-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुर्ग सावंगी (ता.कळमनूरी, जि.हिंगोली) येथे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी विनापरवाना तोडलेले सागवान व वृक्षतोड मशीन दिनांक २८ ऑक्टोबर २०१५ रोजी वा त्यासुमारास जप्त केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी कोणतीच कारवाई केली नसल्याने दोषींविरुध्द गुन्हा नोंदविण्यात यावा अशी मागणी दिनांक ५ नोव्हेंबर २०१५ रोजी विभागीय वन अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी दिनांक ५/११/२०१५ रोजी लेखी तक्रार विभागीय वन अधिकाऱ्यांकडे करण्यात आली होती. तथापि, तत्पूर्वीच दिनांक २८/१०/२०१५ रोजी सदर प्रकरणी दोषींविरुध्द वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(३) व (४) प्रकरणातील आरोपीविरुध्द भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये तसेच महाराष्ट्र वन नियमावली चे कलम ३१ अन्वये गुन्हा नोंदवून आरोपींकडून रु.५,०००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

---

**राज्यात सुमारे २ लाख २४ हजार हेक्टर वन जमिनीवर अतिक्रमण झाल्याबाबत**

**(२६) ४२०१४ (०७-०५-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमीन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे २ लाख २४ हजार हेक्टर वन जमिनीवर अतिक्रमण झालेले असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे,

(३) तद्नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०७-२०१६) :**(१) २०१५-१६ अखेरच्या अभिलेख प्रमाणे सुमारे ५९ हजार हेक्टर वन जमिन अतिक्रमण खाली असल्याची नोंद आहे. यामध्ये वन हक्क कायद्याखाली प्रलंबित वैयक्तिक दाव्यातील क्षेत्राचा ही समावेश आहे.

(२) व (३) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ५३, ५४ व ५४ (अ) अनुसार प्राप्त जिल्हाधिकारी यांचे अधिकार वापरुन वन विभागामार्फत प्राधिकृत अधिकारी यांचेद्वारे अतिक्रमण हटविण्याची पुढील कार्यवाही करण्यात येते. मात्र ज्या प्रकरणात वनहक्क कायद्याखाली दावा प्रलंबित आहे अशा प्रकरणात सदर दाव्यांबाबत अंतिम निर्णय होईपर्यंत अतिक्रमण होऊ नये म्हणून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत नियमित गस्त करण्यात येत असून अतिक्रमण आढळून आल्यास त्वरीत हटविण्याबाबत व चौकशीअंती प्रकरण न्यायप्रविष्ठ करण्याबाबत कार्यवाही करण्यात येते. तसेच वेळोवेळी पोलीस विभागाची मदत घेवून अतिक्रमण निर्मुलन करण्यात येते.

---

**राज्यात मेंढी चराईसाठी उपलब्ध असलेल्या व नसलेल्या वनविभागाच्या क्षेत्राबाबत अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीबाबत**

**(२७) ४२३६७ (०७-०५-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मेंढी चराईसाठी उपलब्ध असलेल्या व नसलेल्या वनविभागाच्या क्षेत्राबाबत अभ्यास करण्यासाठी शासनाने एक समिती दिनांक २५ सप्टेंबर, २०१५ रोजी स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीचा अहवाल माहे डिसेंबर, २०१५ अखेर पूर्ण होईल असे आश्वासन राज्याचे वनमंत्री महोदयांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने प्रश्न क्रमांक दोन बाबतचा अहवाल जाहिर केला आहे काय, त्या अहवालाचे स्वरुप कशाप्रकारचे आहे,

(४) अद्याप, शासनाने वरील प्रकरणांची चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१६) :**(१), (२) व (३) दिनांक ०२.०९.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात मेंढी चराईसाठी उपलब्ध असलेल्या व नसलेल्या वनविभागाच्या क्षेत्राबाबत अभ्यास करण्यासाठी शासनाने एक समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने आपला अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे मार्फत दिनांक २८.०४.२०१६ रोजी शासनास सादर केला आहे. सदर अहवालाचे शासन स्तरावर संस्करण चालू आहे. समितीचा अहवाल जाहीर करण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह राज्यात विविध ठिकाणी शासकीय व खाजगी रुग्णालयातील डॉक्टरांवर रुग्णाच्या नातेवाईक व इतर काही समाजकंटकाकडून जीवघेणे हल्ले होत असल्याबाबत**

**(२८) ४२४१० (०३-०३-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात विविध ठिकाणी शासकीय व खाजगी रुग्णालयातील डॉक्टरांवर रुग्णाच्या नातेवाईक व इतर काही समाजकंटकाकडून जीवघेणे हल्ले होत असल्याची अतिशय गंभीर बाब असूनही डॉक्टरांना कोणतेही संरक्षण देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉक्टरांवरील होत असलेले हल्ले त्वरीत थांबविण्याबाबत तसेच त्यांना संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२१-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.
महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ति आणि वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अधिनियम, २०१० अंतर्गत डॉक्टर्स व निमवैद्यकीय कर्मचारी यांना संरक्षण देण्यात आलेले आहे.
(२) वैद्यकीय सेवा व्यक्ति व वैद्यकीय सेवा संस्था यांची सुरक्षितता व रक्षण यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासन निर्णय दि.२३.०८.२०१३ अन्वये प्रत्येक जिल्हयासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली सुरक्षा समिती गठीत करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील राधानगरी अभयारण्यातील भांडणे येथे भेकराची चोरटी शिकार केल्याबाबत**

**(२९) ४२७१७ (०७-०५-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील राधानगरी अभयारण्यातील भांडणे येथे भेकराची चोरटी शिकार केल्याप्रकरणी ९ जणांना अटक केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी अटक करण्यात आलेल्यांवर शासनाने फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१६)** :(१) भांडणे, राधानगरी अभयारण्य (कोल्हापूर) येथे भेकराची चोरटी शिकार केल्याचे आढळून आले नाही तथापि दहा लोकांनी विना परवाना बंदूक व काडतुसांसह अभयारण्य क्षेत्रात अपप्रवेश करुन, विस्तव निर्माण केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे. ह्या प्रकरणी १० जणांना अटक करण्यात आली होती.
(२) अटक करण्यात आलेल्या आरोपींना मा.न्यायालयाने जामिनावर सोडण्यात आले आहे. उक्त आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय अधिकारी व कर्मचारी भरतीवर बंदी घालण्याच्या निर्णयाबाबत**

**(३०) ४३३०५ (१७-०५-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात यापुढे शासकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे भरण्याबाबत तसेच रिक्त पदाच्या भरतीवर बंदी घालण्याचा निर्णय शासनाने दिनांक 3 जून, 2015 रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात शासकीय अधिकारी व कर्मचारी यांची किती पदे रिक्त आहेत,
(३) असल्यास, शासनाने यापुढे पदे न भरण्याचा निर्णय घेतल्यामुळे कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कामाचा अतिरिक्त ताण पडणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०७-२०१६)** :(१) अंशतः खरे आहे.

राज्य शासनाच्या वित्त विभागाच्या दि. ०२/०६/२०१५ च्या शासन निर्णयान्वये नवीन पदनिर्मिती निर्बंध घालण्यात आला आहे. मात्र हे बंधन सिडको, MMRDA, PMRDA, NIT, NMRCL, MMRCL, PMRCL यासारख्या आर्थिक सक्षम स्वायत्त संस्थांना तसेच केंद्र पुरस्कृत (ज्या आस्थापनांचे पगार केंद्र शासनाच्या अनुदानातून होतात) संस्थांना लागू नाही. तसेच सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ३ (क) मध्ये नमूद केलेल्या शिक्षण, पोलीस कॉन्स्टेबल, ग्राम सेवक, तलाठी, आरोग्य परिचारिका, पशुधन परीवेक्षक, मत्स्य व्यवसाय

विभागाने तालुका स्तरावरील अधिकारी, वन रक्षक, कृषी सहायक, पाटबंधारे विभागाचेकनिष्ठ अभियंता या सवंर्गातील एकूण रिक्त पदांपैकी ७५ टक्के पर्यंत पदे भरण्यास मुभा देण्यात आला होती. त्यामध्ये दि. १५/०१/२०१६ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली असून आता उपरोक्त संवर्गातील एकूण रिक्त पदांपैकी ५० टक्के पर्यंत पदे भरण्यास मुभा देण्यात आली आहे.

तसेच उपरोत (क) मध्ये नमूद केलेल्या संवर्गाव्यतिरिक्त इतर संवर्गातील सरळ सेवेच्या कोट्यातील रिक्त असणऱ्या पदांपैकी ५०% किंवा एकूण संवर्गाच्या ४% यापैकी जे कमी असेल इतकी पदेभरण्यास मंजूरी दिलेली आहे. उर्वरित पदे भरण्यासाठी अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे.

(२) राज्यातील शासकीय कार्यालये व जिल्हा परिषद कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची दि. ३१/१२/२०१५ अखेर एकूण रिक्त पदे १४५२७४ एवढी असून, त्याची टक्केवारी एकूण मंजूर पदाच्या १४% एवढी आहे.

(३) व (४) पदभरतीसंबंधात वेळोवेळी आढावा घेऊन धोरण ठरविण्यात येते. खर्चातील काटकसरीच्या अनुषंगाने निर्बंध घातले आहेत. तथापि, प्रश्नातील भाग १ मध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता पदभरतीवर पूर्णपणे बंदी घालण्यात आलेली नाही.

---

## चंदगड (जि.कोल्हापूर) येथील किळव परिसरात जंगली हत्तींनी मानवी वस्तीत शिरुन घरांचे व शेतीचे मोठया प्रमाणात केलेले नुकसान

**(३१) ४३३४३ (०७-०५-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) येथील किळव परिसरात जंगली हत्तींनी मानवी वस्तीत शिरुन घरांचे व शेतीचे मोठया प्रमाणात माहे जानेवारी २०१६ मध्ये नुकसान केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ग्रामस्थांनी वन विभाग कोल्हापूर यांच्याकडे त्याच दरम्यान तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे,

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

किळव नावाचे गाव चंदगड तालुकयात व वनपरिक्षेत्रात नाही.

(२) व (३) माहे जानेवारी, २०१६ मध्ये मौजे हेरे, उमगांव, पिंळणी व भोगली परिसरात वन्यहत्तीचे वास्तव्य होते. सदर परिसरात वन्यहत्तींनी शेतपिकांचे नुकसान केल्याची ८३ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रचलित शासन निर्णयातील तरतूदींच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई म्हणून रु.२,४१,९४२/- इतके आर्थिक सहाय्य अदा करण्यात आले आहे.

वन्यहत्तींकडून होणारा उपद्रव रोखण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत मौजे हेरे, ता.चंदगड येथील ग्रामस्थांनी दिनांक ११.०२.२०१६ रोजी निवेदन दिले आहे. त्या अनुषंगाने दिनांक १६.०२.२०१६ रोजी उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, गडहिंग्लज यांचे कार्यालयात वन विभागातील अधिकारी, उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, गडहिंग्लज व स्थानिक ग्रामस्थ यांची संयुक्त बैठक घेण्यात आली आहे.

वनविभागामार्फत आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने राबविणचे अनुषंगाने सकारात्मक कार्यवाही करण्यात येत असलेबाबत ग्रामस्थांना अवगत करण्यात आले आहे.

---

**राज्यात वन्य प्राण्यांपासून पिकाचे, फळझाडांचे नुकसान झाल्यास**
**शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचा शासनाचा निर्णय**

**(३२) ४३७४७ (०७-०५-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन्य प्राण्यांपासून पिकाचे, फळझाडांचे नुकसान झाल्यास त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचा निर्णय शासनाने दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अदयाप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

वन्यप्राण्यामुळे पिकांचे, फळझाडांचे नुकसान झाल्यास संबंधित शेतकऱ्यास नुकसान भरपाई देण्याचा निर्णय प्रथमत: सन २००४ साली घेण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक ३.०८.२००४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तद्नंतर शासनामार्फत नुकसान भरपाईच्या रकमेत वेळोवेळी वाढ करण्यात आली आहे.

(२) सद्यस्थितीत प्रचलित शासन निर्णयान्वये संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात व्याघ्र प्रकल्प आणि अभ्यारण्यात एनटीसीएने तयार केलेले जिप्सीचे निकष पाळले जात नसल्याबाबत**

**(३३) ४३७९२ (०७-०५-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात व्याघ्र प्रकल्प आणि अभयारण्यात एनटीसीएने तयार केलेले जिप्सीचे निकष पाळले जात नसल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच दक्षिण अफ्रिकेत जंगलात भ्रमंती करण्यासाठी जिप्सींची उंची जास्त असून त्या पर्यटकांच्या दृष्टीकोनातून केल्या आहेत मात्र महाराष्ट्रात उंच जिप्सी नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले व तदनुसार महाराष्ट्र राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरणाने लावलेले निकष पाळणेबाबत तसेच जिप्सीची उंची वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

एनटीसीएकडून व्याघ्र प्रकल्पाबाबत जारी केलेल्या मार्गदर्शन सूचनांमध्ये जिप्सीचे विशिष्ट निकष निश्चित करण्यात आलेले नाहीत. वाहनांची संख्या, त्यातील अंतर याबाबत काही निकष तयार केलेले आहेत.

(२) हे खरे नाही.

दक्षिण आफ्रिका व भारतातील वनाचे, वन्यप्राण्याचे प्रकार यात भिन्नता असल्याने आफ्रिकेत असलेले निकष भारतात/महाराष्ट्रात लागू करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील तानसा अभयारण्य बेलनाला येथे भुयाराचे व विहिरीचे अनधिकृतरित्या काम सुरु केल्याबाबत**

**(३४) ४४६९५ (०७-०५-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील तानसा अभयारण्य बेलनाला येथे मे. प्रतिभा कंपनीने कोणतेही परवाने न घेता रॉयल्टी न घेता बांधकाम साहित्याचा साठा करुन भुयाराचे व विहिरीचे अनधिकृतरित्या काम सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत कामाबाबत शहापूर येथील तत्कालीन लोकप्रतिनिधींनी दिनांक १० एप्रिल, २०१३ रोजीच्या पत्रान्वये व त्यानंतर अनेकवेळा मा.वनमंत्री व सचिव, वन विभाग तसेच शहापूर येथील वन विभागाचे अधिकारी यांचेकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार सुरु असलेले काम तात्काळ बंद करण्याबाबत तसेच संबंधित प्रकरणातील दोषी कंपनी, ठेकेदार व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कडक कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व या प्रकरणाबाबची सद्य:स्थिती काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१६)** :(१) हे खरे नाही.
सदर बाब ही वन क्षेत्रावरील नसल्याने वन विभागाच्या अखत्यारीतील नाही.
(२) श्री.कुंदन पाटील, अध्यक्ष, पर्यावरण विभाग वाडा तालुका, कॉग्रेस कमिटी यांनी दिनांक २५/०४/२०१२ रोजी तत्कालीन मा.मंत्री (वने) यांना अश आशयाचे निवेदन दिले आहे.
(३) व (४) प्रकरणी चौकशी करण्यात आली तथापि ही बाब विभागाच्या अखत्यारीतील नसल्याने वन विभागाकडून कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुंदेवाडी ते सायाळे (ता.सिन्नर, जि.नाशिक) वळण योजनांच्या निविदा प्रक्रियेवरील स्थगिती रद्द करण्याबाबत

**(३५) ४५४६६ (२४-०१-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर विधानसभा मतदार संघातील कुंदेवाडी ते सायाळे वळण योजनांच्या निविदा प्रक्रियेवरील स्थगिती उठविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी दिनांक २५ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.ग्रामविकास व जलसंधारण मंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली होती, हे खरे आहे का,
(२) असल्यास, शासन मंजूरी मिळून देखील जलसंधारण मंडळाने योजनेच्या निविदा प्रक्रियेस दिलेल्या तात्पुरत्या स्थगिती उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०६-२०१६) :**(१) होय.
(२) शासन निर्णय क्र. मजम-२०१५/प्र.क्र.६६/जल-३ दिनांक ८/५/२०१५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या त्रिसदसीय समितीच्या अहवालावर दिनांक २४/९/२०१५ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या ४९ व्या बैठकीत महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत दिनांक १/०४/२०१४ नंतर प्रशासकीय मान्यता दिलेल्या (१२०० योजना) तसेच दिनांक १/४/२०१४ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता दिलेल्या (११३० योजना) परंतु क्षेत्रिय कामे सुरु झाली नाहीत अशा एकूण २३३० स्थगिती दिलेल्या योजनांपैकी जलयुक्त शिवार अंतर्गत येणाऱ्या १०१ योजनांची (किंमत रुपये ५९.०० कोटी) कामे निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली आणि उर्वरित स्थगिती दिलेल्या योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचा ठराव संचालक

मंडळाने पारित केला आहे. त्यास अनुसरुन, उपरोक्त योजनेचा स्थगिती दिलेल्या ११३० योजनांमध्ये कुंदेवाडी ते सायाळे वळण योजनेचा समावेश असून प्रशासकीय मान्यता रद्द करण्याबाबतची कार्यवाही महामंडळ स्तरावर प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शवागारातील डॉक्टर व कामगारांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३६) ४५९१४ (१४-०३-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शवागारातील डॉक्टर व कामगारांना आवश्यक त्या सर्व सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करून देणार असल्याचे माहे डिसेंबर २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, यापूर्वी शवागारामध्ये मृतदेहाची होणारी हेळसांड आणि कामगारांच्या अडचणीबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्व अत्याधुनिक सोयीसुविधांमध्ये नेमक्या कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत,
(४) तसेच या अत्याधुनिक सोयीसुविधा राज्यातील सर्व शवागारात उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे
(२) मुंबईतील चार प्रमुख शवागारांमधील समस्येबाबत यापूर्वी प्रश्न उपस्थित झाला होता.
(३) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत शासकीय रूग्णालयातील शवागारांचे आधुनिकीकरण, मनुष्यबळ व यंत्रसामुग्री इत्यादी बळकटीकरणाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे. शवागारातील डॉक्टर व कर्मचारी वर्ग यांना नियमित आरोग्य तपासणी व लसीकरण, धुलाई भत्ता, प्रोत्साहन भत्ता इ. सुविधा उपलब्ध आहेत.
(४) होय.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राधानगरी तालुक्यातील (जि.कोल्हापूर) काळम्मावाडी धरण क्षेत्रातील परिसरात राखीव असलेल्या जंगलामध्ये शिरुन शिकारीच्या हेतूने फिरणाऱ्या काही नागरीकांना वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी ताब्यात घेतल्याबाबत**

**(३७) ४६२५३ (०७-०५-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी तालुक्यातील (जि.कोल्हापूर) काळम्मावावाडी धरण क्षेत्रातील परिसरात राखीव असलेल्या जंगलामध्ये शिरुन शिकारीच्या हेतूने फिरणाऱ्या काही नागरीकांना वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात ताब्यात घेतले होते, हे खरेआहे काय,

(२) तसेच चौकशी करत असतांना कोणतीही कायदेशीर कारवाई न करता त्यांच्याशी संगनमत करुन दीड लाख रुपये घेतले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच संबंधित दोषी कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१६) :**(१) दिनांक ११.११.२०१५ रोजी राधानगरी अभयारण्य (जि.कोल्हापूर) भांडणे येथे दहा लोकांनी अनधिकृतरित्या शिकारीच्या उद्देशाने विना परवाना बंदूक व काडतुसांसह अभयारण्य क्षेत्रात अपप्रवेश करुन, विस्तव निर्माण करणे, अनधिकृत वास्तव्य करणे व अनधिकृत बांधकाम व शिकारीचा प्रयत्न केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आल्याने ह्या प्रकरणी १० जणांना अटक करण्यात आली होती.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणात चौकशी केली असता वनगुन्हा न नोंदविता आरोपीकडून रक्कम रु.१.०० लाख स्वीकारुन आरोपीस सोडून दिल्याचे २ वनपाल व १ मजूर यांनी दिलेल्या जबाबानुसार निदर्शनास आले आहे.

(४) व (५) प्रस्तुत प्रकरणात सामिल असलेल्या जिल्हाधिकारी कोल्हापूर कार्यालयातील एका कर्मचाऱ्यास निलंबित करण्यात आले असून उप विभागीय अधिकारी, दुधगंगा उजवा कालवा कार्यालयातील एका कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी चालू आहे ह्या प्रकरणात वनगुन्हा नोंदविण्यात आला असून न्यायालयात दोषीविरुध्द दोषारोप पत्र सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. उपरोक्त गुन्हे प्रकरणी अनधिकृतरित्या तडजोड करणाऱ्या दोन वनपालांना निलंबित करण्यात आले आहे. सदर प्रकरणातील एका सहाय्यक वनसंरक्षकांच्या निलंबन प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

### कोल्हापूर जिल्हयात गवा रेडयांचा उपद्रव्य वाढल्याबाबत

**(३८) ४६७८० (०७-०५-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील पन्हाळा तालुक्यातील धामणी खोऱ्यातील चौके, मानबेट, गारीवडे, बावेली, जर्मी व तसेच गगनबावडा तालुक्यातील गावांमध्ये माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०१५ मध्ये मोठ्या प्रमाणात गवा रेड्यांचा उपद्रव वाढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिसरातील शेतीमध्ये वावरणाऱ्या गव्यांच्या कळपाने नव्याने लागवड ऊसाचे व पीकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान केल्याचे वनविभागाचे निदर्शनास आणण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गवा रेड्यांचा शेतीतील उपद्रव कमी करण्याकरीता वन विभागाने जंगलामध्ये वनतळी बांधणे, गव्यांचा चारा असणाऱ्या विशिष्ट बाबूंची लागवड करणे किंवा डोंगर पायथ्याशी चर खोदणे असे उपाय वन विभागाने केले आहेत का किंवा करण्यात येणार आहेत काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१६)** :(१) व (२) राधानगरी तालुक्यातील चौक व मानबेट तसेच गगनबावडा तालुक्यातील गारविडे, बावेली व जर्गी गावामध्ये सन २०१५-१६ मध्ये गव्यांपासून पिकांचे नुकसान झाल्याच्या घटना निदर्शनास आलेल्या नाहीत. तथापि, गगनबावडा तालुक्यातील मौजे बालेवाडी पैकी गोटमवाडी येथे गव्यांच्या उपद्रवामुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्याची ३ प्रकरणे निदर्शनास आली असून उक्त प्रकरणी संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास रु.१५,८५२/- इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(३) गवा या वन्यप्राण्यांपासून वनक्षेत्रसलगत असलेल्या क्षेत्रामधील उपद्रव रोखण्याच्या दृष्टीने वनतळी बांधणे, वन्यप्राणी प्रतिबंधक चर खोदणे, जलस्त्रोत बळकटीकरण करणे इत्यादी कामे करण्यात आली आहेत.

---

**राज्यातील काही खासगी रक्त पेढ्या शासनाचे नियम डावलून रक्तातील साखरेची मात्र कमी असलेल्या रक्तदात्याचे रक्त घेत असल्याबाबत**

**(३९) ४८०९६ (११-०५-२०१६) श्री. संजय पुराम (आमगाव), श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. शिरीषदादा चौधरी (अमळनेर), डॉ. सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल)** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील काही खासगी रक्त पेढ्या शासनाचे नियम डावलून रक्तातील साखरेची मात्र कमी असलेल्या रक्तदात्याचे रक्त घेत असल्याने सन २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी करुन  यावर आळा घालण्यासाठी कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, नियमाचे उल्लंघन करणा-यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.दीपक सांवत (११-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.
रक्त दात्याकडुन रक्त घेताना Transfusion Medicine Technical Mannual मधील मार्गदर्शक तत्वाचे पालन करण्यात येते.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आखवणे (ता. वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) गावातील देवस्थानाच्या जमीनीत असलेली किंमती झाडे वन अधिकाऱ्यांनी विकल्याबाबत**

**(४०) ४८१६२ (११-०३-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आखवणे (ता. वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) गावातील देवस्थानाच्या जमीनीत असलेली २५ ते ३० लाख रुपये किंमतीची झाडे लिलावात फक्त ६ लाख रुपये किमतीत चुकीची पध्दत अवलंबून वन अधिकाऱ्यांनी विकल्या प्रकरणी ग्रामस्थांनी वैभववाडी पंचायत समितीमध्ये दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास झालेल्या विशेष माहिती सभेत निवेदन देऊन तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने वन विभागाच्या अधिकाऱ्यांची चौकशी उप वन संरक्षक यांच्याकडून करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०३-२०१६) :**(१), (२), (३) व (४) पंचायत समिती वैभववाडी मासिक सभा दिनांक २९.१.२०१६ च्या सभेत सदर विषयासंबंधीच्या ठरावात वन अधिकारी यांचा उल्लेख नाही. तसेच सदरची झाडे वन अधिकाऱ्यांनी विकलेली नाहीत. त्यामुळे उपवनसंरक्षक यांचेकडून चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयात अनुसूचित वृक्षांची अधिकाऱ्यांच्या संगनमताने तोड होत असल्याबाबत**

**(४१) ४८८६३ (१३-०३-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात अनुसूचित वृक्षांच्या यादीत असलेल्या आंबा, सागवान, वड, पिंपळ इ. वृक्षांची अधिकाऱ्यांच्या संगनमताने तोड होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन अनुसूचित यादीतील वृक्षतोड करणाऱ्यांवर कारवाई करण्यासोबतच येथील दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०३-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा, कर्जत, जामखेड (जि.अहमदनगर) येथील पक्षी अभयरण्यासाठी राखीव असलेल्या अभयारण्यात चर खोदून वन्य जीवाचा अधिवास संपुष्टात आणल्याबाबत**

**(४२) ४८९२७ (०७-०५-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा, कर्जत, जामखेड (जि.अहमदनगर) येथील माळढोक पक्षासाठी राखीव असलेल्या अभयारण्यात चर खोदून वन्य जीवाचा अधिवास संपुष्टात आणण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीत काय आढळून आले व तदनुसार वन्य प्राण्यांचा अधिवास संपुष्टात आणणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१६)** :(१) अभयारण्य क्षेत्रात मृद व जलसंधारणाच्या कामासाठी चर खणण्यात आले आहेत तथापि त्यामुळे वन्यजीवांचा अधिवास संपुष्टात आलेला नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नद्या जोड प्रकल्पास असलेला विरोध**

**(४३) ४९६१५ (३०-०४-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशातील नद्या एकमेकांशी जोडल्यास कोणताही विकास होणार नाही उलट देशाचे तुकडे होतील त्यापेक्षा नदीसोबत लोकचळवळ उभारुन या जीवन वाहिन्यांचे आयुष्य वाढावे असे स्पष्ट प्रतिपादन रॅमन मॅगसेस आणि जलक्षेत्रातील नोबेल पुरस्कार प्राप्त डॉ.राजेंद्र सिंह यांनी दि. १९ जानेवारी, २०१६ रोजी केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नदी/ओढ/नाला मधील गाळ काढणे, सरळीकरण व खोलीकरण करणे ही कामे लोकसहभागातून करुन नदी/ओढा/नाला पुनर्जीवन करण्यास ज्या गावातील रहिवाशांनी पुढाकार घेऊन लोकवर्गणी/श्रमदानाद्वारे मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे किंवा देत आहेत, अशा गावांमध्ये घेण्यात आलेल्या नदी /ओढा/नाला पुनर्जीवन कार्यक्रमास प्रोत्साहन देण्यासाठी अभिसरणाच्या माध्यमातून नदी पुनर्जीवन कार्यक्रम राबविण्यास शासन निर्णय दि.८ डिसेंबर, २०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

नदी पुनर्जीवन कार्यक्रमात नद्यांची निवड करण्यांसाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सादरीकरण करण्याचे आवाहन करण्यात आले. त्यानुसार आतापर्यंत १६ जिल्ह्यातील १३९ नदी/नाल्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून त्याअंतर्गत साखळी सिमेंट नाला बांधासाठी रु.१२२०३.३२ लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करंदी खे.बा. (ता.भोर, जि.पुणे) येथे एक गाभण असलेल्या शेळीवर बिबट्याने अचानक हल्ला चढवून शेळी जागीच मृत झाल्याबाबत**

**(४४) ४९८३९ (०७-०५-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करंदी खे.बा. (ता.भोर, जि.पुणे) येथे दहा पंधरा शेळ्यांचा कळप डोंगरामध्ये चरत असताना त्यातील एक गाभण असलेल्या शेळीवर बिबट्याने अचानक हल्ला चढवून त्यात शेळी जागीच मृत झाली, त्यामुळे शेळ्यांच्या मालकांचे मोठे नुकसान झाले असून परिसरामध्ये भीतीचे वातावरण पसरले असल्याची खळबळजनक घटना दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मृत शेळी मालकाच्या झालेल्या नुकसानीबाबत वनविभागाने किती नुकसान भरपाई दिली व बिबट्याला पकडण्याकामी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१६) :**(१) दिनांक ०४.१२.२०१५ रोजी मौजे करंदी खे.बा., ता.भोर, जि.पुणे येथील श्री.प्रकाश मारुती साबळे यांच्या मालकीची शेळी बिबट्याच्या हल्ल्यात मृत पावली आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी प्रचलित शासन निर्णयाच्या तरतूदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त व्यक्तीस रु. ३,०००/- नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे. सदर घटनेमुळे परिसरामध्ये घबराट निर्माण होऊ नये यासाठी भोर उप वनविभाग व संरक्षण समितीमार्फत गस्त घालण्यात आली. परिस्थिती नियंत्रणात असल्याने व मानव-वन्यप्राणी संघर्ष निर्माण न झाल्याने पिंजरे लावण्याची आवश्यकता भासली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिल्लोड तालुक्यात (जि.औरंगाबाद) कोल्हापूरी बंधाऱ्यांना दरवाजे बसविण्याबाबत**

**(४५) ५१०५३ (११-०३-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड तालुक्यात (जि.औरंगाबाद) कोल्हापूरी बंधाऱ्यांना दरवाजे बसवले नसल्याने पाणीसाठा झाला नाही परिणामी शेतीचे संरक्षित पाणी वाहून गेल्याने येथील शेतकऱ्यांना सिंचन करणे शक्य झाले नसल्याचे माहे डिसेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळवून देण्यासाठी येथील कोल्हापूरी बंधाऱ्यांना तातडीने दरवाजे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्यap, कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०३-२०१६) :**(१) होय.

सिल्लोड, तालुक्यातील जिल्हा परिषदेकडील १४३ पूर्ण कोल्हापूरी पध्दतीचे बंधाऱ्यांपैकी ८५ कोल्हापूरी पध्दतीचे बंधाऱ्यांमध्ये गेट टाकण्यात आले होते. ५८ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे नादुरूस्त असून १७ व १८ सप्टेंबर, २०१५ च्या अतिवृष्टिमध्ये कोल्हापूरी पध्दतीचे बंधाऱ्यांचे बाजु भराव वाहून गेल्यामुळे १८ कोल्हापूरी पध्दतीचे बंधाऱ्यांमध्ये पाणी साठा होऊ शकला नाही.

(२) उपलब्ध दरवाजे बसवून पाणी अडविण्यात आलेले आहे. पूर्ण क्षमतेने पाणीसाठा होण्याच्या दृष्टीने आवश्यक नविन दरवाजे बनविणे व दुरूस्तीची अंदाजपत्रके मंजुरीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जननी शिशु सुरक्षा योजनेअंतर्गत प्रसुती व नवजात शिशुंना सेवा मिळण्याबाबत**

**(४६) ५१५३६ (२९-०३-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जननी शिशु सुरक्षा योजनेतंर्गत प्रसुती व नवजात शिशुना सेवा देण्याची शिफारस राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास शासनास केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिफारसीची तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत शासनाकडून आजमितीस कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०६-०४-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

दिनांक ६ ते ७ जानेवारी, २०१६ रोजी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने आयोजित केलेल्या सुनावणीत नवजात शिशुंना देण्यात येणाऱ्या सेवा बाबत चर्चा करण्यात आली होती. तथापि,

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडून यासंदर्भात कोणतीही शिफारस अद्याप प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील धावडा परिसरातील जंगलात मोठयाप्रमाणावर होणाऱ्या अवैध वृक्षतोडीबाबत**

**(४७) ५१९२८ (०७-०५-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील धावडा परिसरातील जंगलात मोठयाप्रमाणावर अवैधवृक्ष तोड होत असल्याने जंगलाचे अस्तित्व धोक्यात आल्याचे नुकतेच जानेवारी २०१६ अंतीम आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील दहा वर्षापासून वृक्ष लागवडीवर मोठयाप्रमाणावर खर्च करण्यात येवूनही झाडांच्या संख्येत मोठया प्रमाणावर घट झाली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणात अवैध वृक्षतोड करणाऱ्यांच्या मोठी टोळी सदर विभागात कार्यरत असून याबाबत वारंवार तक्रारी विभागाकडे देण्यात आलेल्या आहेत हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, अवैध वृक्षतोड करणाऱ्यां टोळींना प्रतिबंध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्यापपर्यंत कार्यवाही न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) सदरील वनक्षेत्रात अवैध वृक्षतोड करणाऱ्यांच्या टोळ्या सक्रीय असल्याचे निदश्रनास आलेले नाही.
(४) अवैध वृक्षतोड होऊ नये म्हणून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडून गस्त घालण्यात येते. तसेच अवैध वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी वाहनांची आकस्मिक तपासणी करण्यात येते. फिरते पथकामार्फतही गस्त घालण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यातील मेळघाट मधील बिरोटी या गावामधील अंगणवाडी केंद्रामध्ये मुलांच्या जेवणामध्ये अळ्या आढळून आल्याबाबत**

**(४८) ५२१५२ (३०-०४-२०१६). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील धारणी तालुक्यातील मेळघाट मधील बिरोटी या गावामधील अंगणवाडी केंद्रामध्ये मुलांच्या जेवणामध्ये अळ्या आढळून आल्याचे उपसरपंचांनी पाहिले असल्याचे निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, याबाबतीत दोषी आढळलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होणाऱ्या दिरंगाईची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) उपसरपंच बिरोटी यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली. सदर चौकशी शिजविलेल्या अन्नात अळ्या आढळून आल्या नाही. तर जुन्या शिल्लक असलेल्या कच्च्या आहाराच्या साठ्यात (वाटाणा) भुंग व छिद्र असल्याचे दिसून आले. परंतु शिल्लक साठ्यातील आहाराचा उपयोग मुलांना खाऊ घालण्याकरिता करण्यात आलेला नाही. सदर प्रकरणाच्या दिवशी अंगणवाडी सेविका रजेवर होती. त्यामुळे उपसरपंच बिरोटी यांनी अशा भुंग लागलेला आहार शिजवण्यावर मनाई केली व शिल्लक साठा पंचनामा करुन त्याची विल्हेवाट लावण्यात आली. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना यापुढे असा प्रकार होणार नाही याबाबत सक्त ताकीद व सूचना देण्यात आल्या.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील मेळघाट मतदार संघामधील माहूताच्या**
**पत्नीचा न्यायासाठी सुरु असलेला संघर्ष**

**(४९) ५२१५३ (०७-०५-२०१६). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील मेळघाट मतदार संघामधील वन विभागाच्या भोला या हतीने १५ मार्च २०१५ रोजी सुरेंद्रसिंग सेंगर या माहूता ला हत्तीने २ वेळा उचलून फेकुन दिल्यामुळे त्याचा मृत्यू झालेला असून,माहुताच्या पत्नीचा १० वर्षापासून न्यायासाठी संघर्ष सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय व दोषी अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करण्यात आली ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

दिनांक १५.०३.२००५ रोजी भोलाप्रसाद ह्या हत्तीने २ वेळा उचलून फेकून दिल्यामुळे माहूत म्हणून काम करणारे मजूर श्री.सुरेंद्रसिग सेंगर यांचा मृत्यू झाला आहे.

सदर व्यक्तिच्या दोन पत्नी होत्या, त्यांनी वारसदार संदर्भात न्यायलयीन प्रकरण दाखल केले होते. सदर प्रकरणाचा निकाल ऑगस्ट, २०१४ मध्ये लागला आहे. सन २००५ च्या

प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीच्या अनुषंगाने नुकसान भरपाई देण्यासाठी मृतक व्यक्तीच्या कायदेशीर वारसास आवश्यक कागदपत्रांची मागणी करण्यात आली आहे. सदरहू आवश्यक त्या कागदपत्रांची अद्याप पूर्तता न झाल्याने आर्थिक सहाय्य देता आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साकोली तालुक्यातील (जि.भंडारा) प्रलंबित असलेला भिमलकसा लघु पाटबंधारे प्रकल्प**

**(५०) ५२४६१ (११-०३-२०१६). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साकोली तालुक्यातील (जि.भंडारा) २५ वर्षापासून प्रलंबित असलेला भिमलकसा लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम ११६.०३ हे वनक्षेत्रातील वृक्षतोड आणि सिमांकना अभावी संबंधित अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे प्रलंबित होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाच्या अटींची पुर्तता करुन तातडीने वनक्षेत्रातील वृक्षतोड व सिमांकनाचा प्रश्न सोडविण्यासाठी शासन राज्यस्तरावरुन ठोस प्रयत्न करणार आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाशी संबंधीत काय कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०३-२०१६) :**(१), (२) व (३) साकोली तालुक्यातील (जि.भंडारा) भिमलकसा लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी ११६.०३ हे वनक्षेत्र वळते करणास केंद्र शासनाने दि.१७/०७/२०१५ रोजीच्या पत्रान्वये काही अटीच्या अधीन राहून अंतिम मान्यता प्रदान केली आहे. त्यातील अट क्र.५ नुसार प्रस्तावातील क्षेत्र हे नवेगाव-नागझिरा-नवीन नागझिरा राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात येत असल्याने वृक्षतोड करण्यापूर्वी मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण (NGT) ची मंजूरी घेणे क्रमप्राप्त असल्याचे उपवनसंरक्षक, भंडारा यांनी पाटबंधारे विभाग (प्रकल्प यंत्रणेस) कळविले आहे.
तसेच अट क्र. ३, ५ व १७ मध्ये बदल करणे आवश्यक असल्याने सदर बदल करण्याबाबत केंद्र शासनास दिनांक १७/०१/२०१६ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.